**ग्रामीण टंचाई ग्रस्त भागात पिण्याच्या पाण्याच्या पुरवठा करण्यासाठी टंचाई निवारक उपाययोजना घेण्यासाठी अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत. . .**

**महाराष्ट्र शासन,**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक टंचाई-२००३/प्र.क्र. ४२/पापु-१४**
**मंत्रालय , मुंबई-४०० ०३२,**
**दिनांकः- १७ फेब्रुवारी , २००३.**

**संदर्भ** : १) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र. टंचाई १०९९/प्र.क्र. १२/पापु-१४, दि. ३.२.१९९९.

२) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापापू-१००१/प्र.क्र. २५०/पापु-०७, दिनांक ३१.३. २००१.

३) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-१००१/प्र.क्र. १६५/पापु-१४, दिनांक १०.१२.२००१.

**प्रस्तावना :-**

राज्यातील ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई परिस्थिती निर्माण झाल्यास तेथे टंचाई निवारक उपाययोजना घेण्यासाठी शासनाने संदर्भाधीन दि. ३.२.१९९९. च्या शासन निर्णयान्वये स्थायी आदेश निर्गमित केले आहेत. त्यानुसार टंचाई निवारक काय्रक्रमांअंतर्गत १) नळ योजनांची विशेष दुरुस्ती २) तात्पुरत्या पुरक नळ योजना ३) विंधण विहीर घेणे ४) विंधण विहीरींची विशेष दुरुस्ती इ. उपाययोजना, टंचाई ग्रस्त भागात राबविण्याचे अधिकार जिल्हाधिका-यांना प्रदान करण्यात आले आहेत. व सदर कार्यक्रमावर विभागीय आयुक्तांनी संनियंत्रण ठेवावयाचे आहे. तसेच, टंचाई निवारक उपाययोजनांवरील खर्च भागविण्यासाठी सर्व विभागीय आयुक्त आणि संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पूणे यांना **" लेखाशीर्ष २२१५ (योजनेतर) "** अंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्यात येत होता. संदर्भाधीन दि. ३१ मार्च २००१ च्या शासन निर्णयान्वये ग्रामीण भागातील पाणी टंचाई अंतर्गत विंधण विहिरीची कामे भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेएवजी जिल्हा परिषदांमार्फत घेण्यात येत आहे. संदर्भाधीन दि. १०.१२.२००१. च्या शासन निर्णयान्वये पाणी टंचाई निवारण कार्यक्रमाकरिता आवश्यक सर्व निधी नैसर्गिक आपत्ती अंतर्गत, **" लेखाशीर्ष २२४५ "** खाली उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच, विंधण विहिरींसाठी अनुदान संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचेऐवजी संबंधित विभागीय आयुक्त यांना उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

टंचाई कार्यक्रमाअंतर्गत विंधण विहिरींच्या कामाचे सुयोग्य सनियंत्रण ठेवण्याचे दृष्टिने टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणा-या विधण विहींरींसाठी शासकिय अनुदान पूर्वी प्रमाणेच संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांचे अधिनस्त ठेवण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :**

ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घेण्यात येणा-या विंधण विहिरींसाठी शासनाकडून उपलब्ध करुन द्यावयाचे अनुदान , दि. १ मार्च २००३ पासून संचालक , भूजलसर्वेक्षण व विकास यंत्रणा , पूणे यांचेमार्फत जिल्हा परिषदांना उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. यापुढे पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घेण्यात येणा-या विंधण विहिरींची खर्च भागविण्यासाठी आवश्यक अनुदानाची मागणी संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास

यंत्रणा, पुणे यांनी शासनाकडे करावी, विंधण विहिरी व्यतिरिक्त इतर सर्व टंचाई निवारण उपाययोजनांसाठी अनुदानाची मागणी पूर्वीप्रमाणेच महसूल विभागाच्या विभागीय आयुक्तांनी शासनाकडे करावी.

यापूढे पाणी टंचाई कार्यक्रमाअंतर्गत घेण्यात येणा-या विंधण विहिरींचे संनियंत्रण संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांचे कडे सोपविण्यात येत आहे. या कार्यक्रमाचे प्रगती अहवाल आवश्यकतेनुसार दर सोमवारी संचालकांकडून सादर होतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**(रु. न. देशमूख )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत,

सर्व विभागीय आयुक्त
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा , पुणे,
उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
सर्व जिल्हाधिकारी (सर्व)
जिल्हा पाणी पूरवठा अधिकारी ।तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकारण (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद, सर्व
मूख्य लेखा व वित्त अधिकारी , जिल्हा परिषद सर्व
जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व
सदस्य सचिव/तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण , मुंबई
प्रादेशिक मुख्य अभियंता ), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सर्व
अधिदान व लेखा अधिकारी , मुंबई,
निवासी लेखा अधिकारी , मुंबई,
मुख्य लेखा परिक्षक , स्थानिक निधी लेखा , कोंकण भवन , नवी मुंबई.
उप मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा (सर्व)
महाराष्ट्र शासनलेखापाल , महाराष्ट्र ३१ मंबंई (लेखा परिक्षा/लेखा अनुज्ञेयता)
महाराष्ट्र शासनलेखापाल महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा परिक्षा/लेखा अनुज्ञेयता)
कक्ष अधिकारी , व्यय-३/व्यव-९/अर्थसंकल्प-१९ , वित्त विभाग, मंत्रालय , मुंबई.
महसूल व वन विभाग , म-७, म-११ व म-३
पा णी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यसने
निवडनस्ती, पापू-१४.

४२२